# खोक्या भोसलेंचे घर वनक्षेत्राच्या बाहेर असताना पाडले असेल तर वनाधिकाऱ्यांवर होणार कारवाई!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २०० ■ मंगळवार दि.८ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 200 ■ Tuesday Dt.8 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4




# खोक्याला वाचवण्यासाठी भाजपची अंधारातून खेळी; आ.सुरेश घसांचे काटोकाठ प्रयत्न?

## खोक्या भोसले जर वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण करून रहात असेल तर वनविभागाची कारवाई योग्यच म्हणावी लागेल?

## तसे नसेल तर चौकशी अंती वनाधिकाऱ्यांवर नक्कीच कारवाई करण्यात येईल : वनमंत्री गणेश नाईक

## अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन सूचना देण्यासाठी आज आणि उद्या वनविभागाच्या महत्त्वाच्या बैठकांचे आयोजन

## वाघांचा मानवासोबत होणारा संघर्ष, वाघांचे मानवावर होणारे हल्ले, मानवाने वाघाची केलेली शिकार आणि वाघांच्या मृत्यू बद्दल या बैठकीत होणार चर्चा?







बीड । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्हा अनेक कारणांमुळे सतत चर्चेत आहे. खोक्या उर्फ सतीश भोसलेच्या कारनामांमुळे पुन्हा जिल्ह्याची चर्चा होतीये.सतीश भोसले उर्फ खोक्या हा भाजप आमदार सुरेश धस यांचा अत्यंत जवळचा कार्यकर्ता आहे. ढाकणे पिता–पुत्रांना अमानुषरीत्या मारहाण तसेच वन्य प्राण्यांची शिकार केल्या प्रकरणी सतिश उर्फ खोक्या भोसलेला बीड पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. तसेच वनविभागाकडून त्याच्या घरावर बुलडोझर फिरवून घर उध्वस्त केले आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी खोक्या उर्फ सतीश भोसले च्या कुटुंबीयांचे घर वनक्षेत्राच्या बाहेर असताना पाडले असेल तर त्यांच्या विरोधात कारवाई केली जाईल, असे वक्तव्य भाजपचे नेते तथा वनमंत्री गणेश नाईक यांनी केले आहे.

गणेश नाईक पुढे बोलताना म्हणाले की, खोक्या भोसले जर विन विभागाच्या जागेवर अतिक्रमण करून ते राहत असेल, तर वन विभागाची कारवाई योग्यच म्हणावी लागेल. तसे नसेल तर चौकशी अंती वनाधिकाऱ्यांवर नक्कीच कारवाई करण्यात येईल, भाजपचा कार्यकर्ता खोक्या उर्फ सतीश भोसले यांचे घर जमीनदोस्त करण्यात आले. वन विभागाच्या वतीने सतीश भोसले च्या घरावर बुलडोझर चालवण्यात आला. यावर बोलताना

पान २ वर

### खोक्या भोसलेला वाचवण्यासाठी भाजपची अंधारातून खेळी?

खोक्या उर्फ सतीश भोसले हा भाजप आमदार सुरेश धस यांचा अत्यंत जवळचा कार्यकर्ता आहे. अत्यंत जवळचा कार्यकर्ता असल्यामुळे आमदार सुरेश धस यांनी यंत्रणा हलवली असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. तसेच आमदार सुरेश धस यांनी भाजपची यंत्रणा अंधारातून चालवत असल्याची देखील चर्चा होत आहे. आमदार सुरेश धस हे खोक्यावर उपस्थित भोसले याला या प्रकरणातून वाचवण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे सांगितले जात आहे. जिल्हा प्रशासनाने आमदार सुरेश धस यांना देखील या प्रकरणात सह आरोपी करून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. खोक्या भोसले ला वाचवण्यासाठी आमदार सुरेश धस यांचे काटोकाठ प्रयत्न? या प्रकरणाची सखोल चौकशी करूनच वन मंत्री गणेश नाईक यांनी पुढील कारवाई करावी अशी देखील मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# येवलवाडीच्या सरपंचांवर अविश्वासाचा ठराव

## राजकीय दबाव तंत्रामुळे प्रशासनाच्या निर्णयाकडे लक्ष

बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील येवलवाडी ग्रामपंचायतची निवडणुक होऊन सव्वा दोन वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला आहे. या कालावधीत सरपंचाचा कारभार त्यांचा पती हाकत असल्यामुळे आणि गावात विकास कामे होतं नसल्याने गावकरी आणि ग्रामपंचायत सदस्य देखील समाधानी नाहीत. त्यामुळे याबाबत अविश्वास ठराव घेण्यात आला होता. शुक्रवारी (दि.११) याची सुनावणी पाटोदा तहसीलदार यांच्यासमोर होणार आहे. दरम्यान अविश्वास ठराव आणल्यामुळे लोकप्रतिनिधी यानी पुढाकार घेऊन सदस्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरु केले आहेत. प्रशासनावर देखील राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न आत सुरु झाल्याच्या चर्चा असल्यामुळे आता तालुका दांडाधिकारी यांच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

पाटोदा तालुक्यातील येवलवाडीमधील ग्रामपंचायत सात सदस्यांची आहे. सव्वा दोन वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत सरपंच म्हणून नागरजोगे विजया किशोर निवडणून आल्या होत्या. ही ग्रामपंचायत महिलाला सुटली असताना याचा कारभार सरपंचपतीच हाकत होते. गावात ग्रामसभा नाही, विकास कामे होतं असताना सदस्यांना विश्वासात घेतले जात नव्हते, कामात होणाऱ्या सततच्या अनियमितता त्यामुळे याबाबत अविश्वास ठराव घेण्यात आला. यात सहा सदस्यांनी स्वाक्षरी करत

पान २ वर

# चौसाळा ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी २४ कोटींचा निधी मंजूर

## प्रशासकीय मान्यता प्राप्त; उपमुख्यमंत्री अजित पवारांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले आभार



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील चौसाळासह परिसरातील आरोग्य सुविधांमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. यासाठी राज्य सरकारकडून २४ कोटी ४५ लक्ष ६३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून बुधवारी (दि.९) अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम होणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून हा निधी मंजूर झाला आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

चौसाळा येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी आणि जागा उपलब्धतेसाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सातत्याने पाठपुरावा केलेला होता. आता त्यांच्या मार्गदर्शनाखाली निधीसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला आहे. भरीव निधी प्राप्त झाल्यामुळे चौसाळा परिसरातील हजारो नागरिकांना दर्जेदार आणि आधुनिक वैद्यकीय सुविधा स्थानिक पातळीवरच मिळू शकणार आहेत. आतापर्यंत अनेकवेळा रुग्णांना प्राथमिक उपचारासाठी जिल्हा रुग्णालय गाठावे लागत होते.

मात्र, ग्रामीण रुग्णालय स्थापन झाल्यानंतर विविध उपचार, तपासण्या व तातडीच्या सेवा याठिकाणीच उपलब्ध होतील. या रुग्णालयासाठी निधी मिळवण्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. विविध स्तरावर पाठपुरावा करून त्यांनी ही मागणी शासनदरबारी मांडली होती. त्यांच्या या प्रयत्नांना आता यश आले असून, त्यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विशेष आभार मानले आहेत. या निर्णयामुळे चौसाळा परिसरातील आरोग्यसेवा क्षेत्रात मोठी क्रांती होणार असून, गावातील नागरिकांबरोबरच आजूबाजूच्या भागातील लोकांनाही त्याचा लाभ मिळणार आहे. लवकरच कामाला सुरुवात होणार असून, येत्या काही महिन्यांत ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम व सुविधा उभारणीचे काम वेगात सुरू होईल, अशी माहितीही मिळत आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची वृत्तपत्र चळवळही वास्तववादी, संवेदनशील व दिशादर्शक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारत संविधान निर्माता, एक प्रभावी विचारवंत, समाज सुधारक आणि राजकीय नेतेच नव्हते, तर ते एक उत्कृष्ट पत्रकार आणि संपादक देखील होते. त्यांच्या पत्रकारितेत त्यांची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचारधारा स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. त्यांनी चालवलेली वृत्तपत्रे भारतीय समाजातील अनेक समस्यांवर प्रकाश टाकत, असमानतेविरुद्ध आवाज उठवत, आणि जनजागृतीसाठी महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाच्या विविध वर्गांमध्ये जागरूकता निर्माण झाली, आणि हे वृत्तपत्रे केवळ माहिती पुरविण्यासाठीच नव्हे, तर लोकांना त्यांच्या हक्कांसाठी लढायला प्रेरित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले.

वृत्तपत्रांचे महत्त्व:

बाबासाहेबांचे वृत्तपत्र चालवण्याचे उद्दिष्ट सामाजिक न्यायाचा संकल्पना लोकांच्या पर्यंत पोहोचवणे आणि त्यांच्या हक्कांसाठी लढणे हे होते. त्यांनी आपल्या पत्रकारिता द्वारे समाजाच्या दुर्लक्षित आणि उपेक्षित घटकांची ओळख करून दिली. ते मानतात की, एखाद्या पक्षाला त्याचे मुखपत्र नसल्यास तो पक्ष पंख छाटलेला किंवा पंख नसलेला पक्षाप्रमाणे असतो. हे त्यांनी अधोरेखित केले आहे. यामुळे त्यांनी विविध वर्तमानपत्रे सुरू करून चालवली , ज्या माध्यमातून त्यांनी आपल्या विचारांना एक स्वतंत्र मंच मिळवून दिला, आणि समाजातील अन्यायाच्या विरोधात आवाज उठवला.

प्रमुख वृत्तपत्रे:

१. बहिष्कृत भारत – या वृत्तपत्राद्वारे त्यांनी दलित समाजाच्या संघर्षांची आणि त्यांच्या हक्कांसाठीची चेतना जागृत केली. यामुळे दलित समुदायात आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यांच्या समस्या समाजात उघडपणे चर्चिल्या गेल्या.

२. मूकनायक – या वृत्तपत्राने समाजातील आवाज नसलेल्या वर्गाच्या भावना आणि समस्यांवर लक्ष केंद्रित केले. या माध्यमाने त्यांना त्यांच्या अधिकारांबद्दल जागरूक केले आणि सामाजिक असमानता विरुद्ध एक ठळक आवाज उभा केला.

३. जनता – राजकीय विषयांवर ताजे व सखोल विचार मांडणारे एक महत्वपूर्ण माध्यम. या वृत्तपत्राने लोकांना विविध राजकीय घटनांची माहिती दिली आणि त्यांच्या सहकारी हक्कांची जागरूकता वाढवली.

४. प्रबुद्ध भारत – या माध्यमाद्वारे त्यांनी शिक्षण, सभ्यता आणि समानतेसारख्या विषयांवर भाष्य केले. शिक्षणाच्या महत्वावर त्यांनी जोर दिला आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी सतत आह्वान केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेतील योगदान केवळ माहिती देणे नाही, तर तो एक शक्तिशाली परिवर्तनाचा माध्यम होता. त्यांच्या विचारांची साधना आणि पत्रकारिता आजही प्रेरणादायक आहे. त्यांनी सामाजिक आश्रयाची आणि न्यायाची जाणीव लोकांपर्यंत नेणारे एक महत्त्वपूर्ण साधन गवसले आहे. त्यांच्या सृजनशीलतेमुळे अनेक लाख लोकांना आज त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करण्याचा मार्ग प्राप्त झाला. त्यांच्या कामामुळे आजही लाखो लोकांना प्रेरणा मिळते, कारण ती लोकशाहीच्या प्राथमिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करते. आंबेडकरांच्या पत्रकारितेमुळे एक नवीन सामाजिक चळवळ निर्माण झाली, जी आजतागायत चालू आहे.


**बालाजी जगतकर**
**बीड – ९९६०१७४५९७**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त लेखमाला, क्र.२**




# जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांच्या निधनाने पत्रकारितेतील मार्गदर्शक हरपला : ना.पंकजाताई मुंडे

गेवराई । प्रतिनिधी

दर्पण पुरस्कार प्राप्त गेवराईचे जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांच्या दुःखद निधनाबद्दल महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण वातावरणीय बदल पशुवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी काजी यांचे पुत्र पत्रकार काझी अमान यांना शोक संदेश पाठवला आहे. काझी हयातुल्ला यांच्या निधनाने पत्रकारितेतील मार्गदर्शक हरपला आहे. असे त्यांनी शोक संदेशात म्हटले आहे. ज्येष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांच्या धर्मपत्नी तथा पत्रकार काझी अमान यांच्या मातोश्री यांच्या निधनानंतर तत्कालीन मास लीडर असलेल्या गोपीनाथ मुंडे यांनी गेवराई येथील निवासस्थानी भेट देऊन काझी परिवाराचे सांत्वन केले होते. आणि पत्रकारितेत मोलाचे योगदान देणाऱ्या




काझी परिवाराच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा असल्याचे सांगून फार मोठा दिलासा दिला होता. आपल्या वडिलांच्या निधनानंतर पंकजाताईंनी काझी परिवाराचे जुने त्रणानुबंध कायम ठेवत काझी हयातुल्ला यांचे ज्येष्ठ चिरंजीव काजी अमान यांना सोमवारी दि.०७ एप्रिल २०२५ रोजी शोक संदेश पाठवला आहे.

शोकसंदेशात ना पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे की, आपले वडील, ज्येष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांच्या निधनाचे वृत्त समजले. आपण त्यांच्या पत्रकारितेचा वारसा गेल्या अनेक वर्षापासून सक्षमपणे चालवत आहात. काजी हयातुल्ला यांनी स्वर्गीय मुंडे साहेबांसोबत काम केले आहे. पत्रकारितेतील एक मार्गदर्शक आणि सर्व धर्मधर्मसमभाव या भूमिकेतून काम करणारा ज्येष्ठ पत्रकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. मी काझी परिवाराच्या दुःखात सहभागी आहे. अशाप्रकारे शोक संदेश पाठवून पंकजाताईंनी या दुःखद प्रसंगी काझी परिवाराला दिलासा देऊन मुंडे काळजी परिवारांचे जुने ऋणानुबंध कायम ठेवले आहेत.

पान १ वरून...

## खोक्याला वाचवण्यासाठी भाजपची अंधारातून....

वन मंत्री गणेश नाईक यांनी हे वक्तव्य केले आहे. आम्ही महायुतीमध्ये आहोत पण प्रत्येकाला आपआपला पक्ष वाढविण्याचा अधिकार आहे. तो कोणी रोखलेला नाही. कुठल्याही पक्षाच्या नेत्यांना आमदारांना कुठेही जाऊन प्रचार केला तर महायुती मजबूत करण्याचा प्रयत्न केला तर त्यात काही वावगे नाही. १९९५ मध्ये किती झाली होती. तेव्हापासूनच मंत्री आणि राज्यमंत्री यांच्यातील कामाचे वाटप केले होते. त्यानुसारच राज्यमंत्री अधिकार दिले जातील असेही वनमंत्री गणेश नाईक यांनी म्हटले आहे.

वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, ६५ टक्के वन विदर्भात असून आणि वन विभागाचे बहुतांशी कार्यालय ही विदर्भातील नागपुरात आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन सूचना देण्यासाठी आज आणि उद्या वनविभागाच्या महत्त्वाच्या बैठकांचे आयोजन नागपूर येथे करण्यात आले आहे. यामध्ये प्रमुख्याने आम्ही वाघांचा मानवा सोबत होणारा संघर्ष, वाघांचे मानववार होणारे हल्ले मानवाने वाघाची केलेली शिकार आणि वाघांच्या मृत्यूबद्दल या बैठकीत चर्चा करणार आहोत. वन विभागाचा उत्पन्न वाढावे यासाठी वन विकास महामंडळ, मंग्रोव्ह डिव्हिसन आणि सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून सुरू आहे. महाराष्ट्राचे वनक्षेत्र २१ टक्के वरून ३० टक्के व्हावं यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## येवलवाडीच्या सरपंचांवर अविश्वासाचा ठराव...

कराभाराबाबत नाराजी व्यक्त केली होती. प्रशासनाला दिलेल्या निवेदनावर चिमाकांत नागरगोजे, रत्नमाला नागरगोजे, मधुकर नागरगोजे, उर्मिला नागरगोजे, चतुरा नागरगोजे, इंदूबाई नागरगोजे या सहा सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. याची सुनावणी शुक्रवारी पाटोद्याच्या तहसीलदार यांच्यासमोर होणार आहे. दरम्यान राजकीय दबावामुळे आता सरपंचाचे पद जाते की राहते हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# आनंदाचे उधाण चैत्र महिना...

माझे गाव चकलांबा (ता गेवराई जिल्हा बीड) माझ्या गावाला ऐतिहासिक आणि पारंपारिक असा खुप मोठा वारसा लाभलेला आहे. गावात शेती क्षेत्र बऱ्यापैकी आहे. पण सिंचनाचे पर्याय कमी असल्याने बरेच लोक प.महाराष्ट्रात ऊस तोडीसाठी जातात अन् चैत्रात परत गावी येतात. चकलांबा गाव बीड व अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमेवर आहे. चैत्र महिना म्हणजे गावकऱ्यांचा साठी आनंदाची पर्वणी किंवा उधान मानले तर वावगे होणार नाही. या महिन्यात माझ्या गावात श्री रोकडेश्वर हनुमान जन्मोत्सवा बरोबरच रामनवमी उत्सव, परंपरेप्रमाणे जानपीर बाबा यात्रा, बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम, महावीर जयंती, डॉ.आंबेडकर जयंती याच महिन्यात साजरी होते. ग्रामस्थ व बाहेरगावी गेलेल्या लोकांचे लक्ष विशेषतः चकलांबा या गावात श्री हनुमान रोकडेश्वर जन्मोत्सवाकडे असते. चकलांबा हे चमत्कारिक नावाची गाव बीड गेवराईच्या पश्चिम दिशेला आहे गावाच्या विविध दिशांना यादवकालीन, उत्तर यादवकालीन मठ आणि मंदिरे विखुरलेली आहेत गावाच्या गल्ल्यांमधून फिरताना आपल्याला गावाच्या प्राचीनत्वाची प्रचिती पदोपदी येते. गावात रोकडेश्वराचे भव्य हेमाडपंती मंदिर आहे. आजही बुरुज, वावऱ्या, वाडे,दगडी लेख इतिहासाची साक्ष म्हणून तग धरून आहेत. रोकडेश्वराचा जन्मोत्सव चैत्र पौर्णिमेला दरवर्षी संपन्न होत असतो. त्या निमित्ताने गावात फाल्गुन महिन्यातील रंगपंचमीपासून नाटक निवड व त्याची तालीम रंगमंदिरामध्ये सुरू होते. शेतीची



कामे उरकल्यामुळे शेतकरी, व्यापाऱ्यांच्याकडे उसंत असलेला हा काळ असतो. त्यामुळे कधी चैत्र महिना लागतो यासाठी रसिक वर्ग पूर्वीपासून डोळे लावून बसलेला असतो.

चैत्र शुद्ध त्रयोदशी ते पौर्णिमा असा तीन दिवस चालणाऱ्या या रोकडेश्वर जन्मोत्सवासाठी महिनाभर आधीपासून तयारी सुरू होते. गुढीपाडव्यापासून या जन्मोत्सवाला जो रंग भरत जातो तो पौर्णिमेच्या दिवशी शिगेला पोहोचलेला असतो. गुढीपाडव्याच्या दिवशी सर्व ग्रामस्थ, ताशा, ढोल, घड्याळ, झांजरी, झेंडा घेऊन रोकडेश्वर मंदिरात जाऊन आरतीने या उत्सवाला सुरुवात करतात. या गावाने दिडशे वर्षापासून अखंड अशी नाट्य परंपरा जोपासलेली आहे. अनेक अनेक संगीत, ऐतिहासिक, सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक, लोकप्रबोधनाची नाट्य परंपरा निजामकाळा पासून अनेक सुखदुःखाच्या दऱ्या ओलांडत या नाट्यमंडळाचा प्रवास आजतागायत चालू आहे.. यापूर्वी या नाट्यमंडळाने संत दामाजी, संगीत शारदा, संगीत मानापमान, माझी जमीन, संत तुकाराम, राजा शिवाजी, वीर अभिमन्यू, मोरूची मावशी, वाहतो ही दुर्वांची जुडी, अमलदार, संगीत एकच प्याला, या आणि अशा अनेक नाटकांनी परंपरा जपली आहे. यावर्षीही या नाट्य रोकडेश्वर मंडळाने मच्छिंद्र कांबळे यांचे 'वस्त्रहरण' हे नाटक १२ एप्रिल २०२५ रोजी होणार असून त्याची जोरात तालीम सुरू केली आहे.

गावचा मराठी माणूस उत्सव प्रिय आहे. या चैत्र महिन्यात या गावात दिंडी, लेझीम, जन्माभिषेक, पालखी, भजन, पूजन, नाटक, आरती, महाप्रसाद ,अतिथी पूजन या आणि अशा कार्यक्रमांची रेलचेल या गावात दिसून येते त्यामुळे आनंदाला उधाण म्हणजे चैत्राचा महिना'.. असे आपसुकच तोंडातून बाहेर पडते..

**लेखन**
**श्री धनंजय ध.सुलाखे**
**चकलांबा जि.बीड**
**मो नं. ९४०५३४६२९४**

## पिंपळनेरकर स्वागतासाठी सज्ज : श्री क्षेत्र भगवानगडाच्या ९१ व्या नारळी सप्ताहाचा आज दुपारी बारा वाजता प्रारंभ

# घाटशीळ पारगांवकरांच्या २० क्विंटल लाडूच्या प्रसादाने होणार सप्ताहाची गोड सुरुवात

भगवानगड । प्रतिनिधी

श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९१ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे पिंपळनेर (ता.शिरूर, जि.बीड) ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाची तयारी अंतिम टप्प्यात आली असुन मंडप उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९१ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेऊन बाबांचे कार्य सुरू ठेवले होते. वै.गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या




सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक सप्ताहामध्ये आठवडाभर उपस्थित असतात. नारळाचे यजमानपद स्विकारलेले ग्रामस्थ आठवडाभर तन, मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत असतात.

१० ते १७ एप्रिल हा या महोत्सवाचा कालावधी असून सप्ताहामध्ये दररोज ठीक ३:३० ते ६ या वेळेमध्ये ह.भ.प.श्री. प्रकाश महाराज साठे यांची श्रीमद् भागवत कथा संपन्न होणार आहे. सप्ताहामध्ये अनुक्रमे ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री (उत्तराधिकारी भगवानगड), ह.भ.प. प्रभाकर महाराज बोधले (पंढरपूर), ह.भ.प.सोपान महाराज शास्त्री(भागवताचार्य), ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर (समाज प्रबोधनकार) ,ह.भ.प.अमृत महाराज जोशी (महामंडलेश्वर), ह.भ.प.श्री.ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांवकर) यांच्या कीर्तन सेवा होणार असून सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे जागराचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये परंपरेप्रमाणे दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ इ. धार्मिक कार्यक्रमही होतील.

### महंत नामदेव महाराज शास्त्रीजींचा अभिनव उपक्रम

यंदा उष्णता जास्त असल्यामुळे भाविकांना कीर्तन ऐकताना उकाड्यापासून मुक्तता मिळावी म्हणून सप्ताहातील सर्व कीर्तनं मोकळ्या प्रांगणात होणार आहेत. तर दिवसभरातील कार्यक्रमासाठी भव्य मंडपाची उभारणी केलेली आहे.

### दैनंदिन प्रसादासोबत दररोज मिळणार एका नवीन रुचकर पदार्थाची मेजवानी

श्री क्षेत्र भगवानगडाच्या नारळी सप्ताहामध्ये येणाऱ्या लाखो भाविकांना पिंपळनेर ग्रामस्थ दररोज एका विशेष पदार्थाची मेजवानी देणार आहेत. यामध्ये पहिल्या दिवशी पुरणपोळीचा संपूर्ण स्वयंपाक, दुसऱ्या दिवशी बर्फी, तिसऱ्या मुगाचा शिरा, चौथ्या दिवशी शिंगोरी आमटी, पाचव्या दिवशी जिलेबी, सहाव्या दिवशी गुलाब जाम, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या जागराच्या कीर्तनाला सर्व भाविकांना रुचकर आणि स्वादिष्ट शिंगोरी आमटीचा प्रसाद मिळणार आहे. शिवाय काल्याच्या दिवशी १०० पोते साखरेपासून महाप्रसाद बनवला जाणार आहे.

### घाटशीळ पारगांवकरांच्या २० क्विंटल लाडूच्या प्रसादाने होणार सप्ताहाची गोड सुरुवात

घाटशीळ पारगांवकरांनी श्री क्षेत्र भगवानगडावरील निस्सीम श्रद्धेपोटी भगवानगडाच्या नारळी सप्ताहमध्ये गोड प्रसाददान करून सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गावातील सर्व महिला मंडळींनी रुचकर असा जवळपास २० क्विंटल लाडूंचा प्रसाद बनवला आहे. सप्ताहाला प्रारंभ झाल्याबरोबर या रुचकर लाडूंचा आस्वाद उपस्थित भाविकांना मिळणार आहे.

# रखरखत्या उन्हात तप्त लोखंडाला आकार देणाऱ्या घिसाडी समाजाला मात्र स्वतःच्या आयुष्याला आकार देता येत नाही

## घण लोखंडावर बरोबरच काळजावर सुद्धा; कथा आणि व्यथा विलास पडुळकर घिसाडी कुटुंबाची

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

**रखरखत्या उन्हात बाहेरचं ऊन आणि भट्टीची उष्णता मिळुन उष्णतेची जबर झळ सोसुन वजनदार घण मारून तप्त लोखंडाला आकार देण्याचे काम करणाऱ्या घिसाडी समाजातील लोकांना स्वतःच्या आयुष्याला मात्र आकार देता येत नाही.**

सध्या बीड तालुक्यातील लिंबागणेश या गावी रस्त्याच्या कडेला पिक अप मध्ये अख्खा संसार थाटुन बायको आणि ३ मुलांसह रखरखत्या उन्हात शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी आणि घरगुती उपयोगाची लोखंडाची हत्यारे अवजारे बनविणे हा यांचा परंपरागत व्यवसाय. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील भराडी गावचे विलास कैलास पडुळकर, पत्नी रेणुका, शिवाजी, शिवम आणि कोमल नावाची ३ मुलं. पोटापाण्यासाठी ग्रामीण भागात गावोगावी मुक्काम दर मुक्काम करत पोटाची भुक भागवण्यासाठी धडपड.

**पुरूषांपेक्षा महिलांचे योगदान जास्तीचे**

ग्रामीण महाराष्ट्रात घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसायात पुरूषांपेक्षा जास्तीचे योगदान महिलांचे. त्यासाठी भट्टी लावणे, तप्त लाल लोखंडावर गरजेप्रमाणे ७ ते १५ किलो वजनाचे घण मारणे.

ग्राईंडर मशिन नसल्याने काणसीने हत्यारे घासणे, बनवलेली अवजारे आसपासच्या गावातील आठवडी बाजारात जाऊन विकणे हि कामे प्रामुख्याने महिलाच करतात. शिवाय सगळी घरगुती कामे, मुलांना सांभाळणे हि कामे महिलांनाच करावी लागत असल्याचे रेणुका पडुळकर यांनी सांगितले. सांडपाण्याची व्यवस्था नाही. झोपडीशेजारीच गोलाकार खड्डा करून त्यातच कपडे -भांडी धुण्याचे पाणी, शिवाय मुलाबाळांसाठी आंघोळीसाठी पाणी साठवायचे. शौचालयाची सोय नसल्याने पहाटेच उठून या महिलांना शौचासाठी दुर उघड्यावर जावे लागते.

**शिक्षणाचा गंध नाही, विकासापासून कोसोदुर**

विलास पडुळकर सांगतात त्यांना ३ मुलं दोन मोठे मुलगे शिवाजी आणि शिवम तर धाकटी मुलगी कोमल. यांच्या सोबतच असतात. परंपरागत हाच पोटापाण्याचा धंदा, शिकुन सवरून कामधंद्याला लागल्याचं त्यांच्या पाहण्यात नसल्याने शिक्षणाचे महत्त्व नसल्याने शिक्षणावाचुन काही अडत नाही. शाळा शिकलेल्यांना शिक्षणाचा फायदा झालाय, नोकऱ्या लागल्यात असं त्यांच्या ऐकण्यात सुद्धा नाही. घिसाडी जमातीचे लोक प्राचीन काळी राजपूत सैन्यात ढाली तलवारी तयार करणारे कारागीर, तलवारींना धार लावण्याचे काम करायचे आणि त्यांच्या सोबत युद्धभूमीवर सोबत रहायचे. महाराणा प्रतापसिंहाचे आम्ही वंशज असल्याचे ते अभिमानाने सांगतात.



# गुरुवारी परळीत विशेष साप्ताहिक बैठकीचे आयोजन

## फुले, शाहू, आंबेडकर शिवशाहीचा इतिहास आणि वर्तमान

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या साम्राज्याला शिवशाही म्हणून ओळखले जाते. या शिवशाहीचा प्रेरणादायी इतिहास आणि वर्तमान समजून घेण्यासाठी गुरुवारी दिनांक ११ परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने विशेष. साप्ताहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. लोकनेते स्वर्गीय. गोपीनाथराव मुंडे. पत्रकार भवन येथे १० एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता होणार या कार्यक्रमाचे उद्घाटक संभाजीनगर या पोलीस ठाण्याचे पो.नि. धनंजय ढोणे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी. मराठा सेवा संघाचे प्रमुख अतिथी म्हणून ओ. वी. केंद्राची कल्याण अधिकारी शरद राठोड हे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी फुले शाहू आंबेडकर अभ्यास समूहाचे अभ्यासक चेतन निसर्गद हे बुद्धबोधन करणार आहेत. यावेळी ज्येष्ठ पत्रकार. तथा लिंगायत धर्माचे गाढे अभ्यास असणारे ओम प्रकाश बुरांडे, धनंजय अरबुने पत्रकार, प्रवीण फुटके, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे परळी तालुका नियमन निमंत्रक जगदीश शिंदे, धनंजय आढाव, संपादक रामप्रसाद परंड, संपादक ज्ञान व सुरवसे, संपादक राजेश साबणे, महादेव शिंदे यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात १६४६ ते १७१३ या कालखंडात या शिवरायांनी घडवलेल्या प्रेरणादायी इतिहास. त्यांच्या पश्चाताातील पेशव्यांचे निमंत्रण आणि १ जानेवारी १८ १८ रोजी पुणे जिल्ह्यातील भीमा कोरेगाव येथे झालेल्या लढाईनंतर पुन्हा छत्रपती कडे आलेली शिवशाहीची गादी.

याच प्रेरणीतून बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज आणि कोल्हापूरचे छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्यासारख्या संस्थांनी लोक कल्याणकारी राज्यकारभार या महत्त्वपूर्ण राजकीय बदलाच्या पार्श्वभूमीवर १० एप्रिल १८ १८ रोजी छत्रपती प्रताप सिंह महाराजांची पुन्हा साताऱ्याच्या गादीवर झालेली स्थापना या विषयांना उजाळा देण्यात येणार आहे. या कार्यक्रमास शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आव्हान स्वागत अध्यक्ष भगवान सात समुद्रे. रानबा गायकवाड, बा. सो. कांबळे. नितीन ढाकणे आदींनी केले आहे.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ) जनसंपर्क कार्यालय केजचे भव्य उद्घाटन आर.पी. आयचे जिल्हा कार्याध्यक्ष रियल पँथर संदीपान तात्या हजारे यांचे हस्ते व केज तालुका अध्यक्ष सुनील जी हिरवे, भीष्मा हजारे, ईश्वर सोनवणे, बाबुराव गालफाडे, अंगद शिनगारे, विकास मस्के, भिमा हजारे, हिराचंद काळे, अमोल मस्के, सचिन ठोकळ यांचे उपस्थित सम्पन्न झाले. या प्रसंगी केज शहर व तालुक्यातील आर.पी. आयचे सर्व शाखा प्रमुख, पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते.

# माजलगावमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती महोत्सवाचे आयोजन

## कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे शेजुळ, मोरे, धायजे, रेदासनी, काझी, ताकट, मस्के यांचे आवाहन

माजलगाव । प्रतिनिधी

महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त माजलगावात सार्वजनिक जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ९.४५ वाजता डॉ. आंबेडकर चौक येथे निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या उत्सवात तमाम आंबेडकर प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ, श्रीहरी मोरे, नवनाथ धायजे, सुरेंद्र रेदासनी, रियाज काझी, बाळू ताकट यांच्यासह सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे हे १३५ वे वर्ष आहे. या निमित्ताने माजलगाव शहरात सामाजिक एकतेचा संदेश देण्याच्या उद्देशाने सर्व जात, धर्मीय बांधवांच्या वतीने सार्वजनिक जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त शहरातील डॉ. आंबेडकर चौक, येथे सकाळी ९.४५ वा. निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते पार पाडणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान आ. प्रकाश सोळंके भूषवणार आहेत. प्रमुख उपस्थितीत रमेशराव आडसकर, मोहनराव जगताप, दयानंद स्वामी, सहाल चाऊस, कचरु खळगे, विजय साळवे असणार आहेत. त्यामुळे सामाजिक समता वृद्धिंगत करण्यासाठी दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ९.४५ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ उपाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, बाळु ताकट, मुजम्मील पटेल, सचिव एकनाथ मस्के, सहसचिव शरद यादव, कोषाध्यक्ष श्रीहरी मोरे, कमिटी सदस्यः सुशील डक, रियाज काझी, शेख बाबा, राजेश घोडे, लक्ष्मण गायकवाड, सल्लागारः डॉ. सुरेश साबळे, नाना घोडके, सुनील सौंदरमल, डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले, डॉ. दिनकर मस्के, डॉ. श्रेयश देशपांडे, उमेश मोगरेकर, तुकाराम येवले पद्माकर कांबळे, हरिष यादव, प्रभाकर साळेगावकर, दत्ता कांबळे यांनी केले आहे.



# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आठवड येथे निरोप समारंभ व प्रवेशोत्सव उत्साहात

आठवड, ता. अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आठवड येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व नव्याने पहिलीमध्ये दाखल होणाऱ्या चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रेसिडेन्शिअल कॉलेजचे डॉ.म्हातारदेव निंबराज म्हस्के हे उपस्थित होते त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन केले.

इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी आपले अनुभव सांगताना शाळेतील आठवणी, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेतील स्नेह याचे वर्णन भावनिक शब्दांत केले. त्यानंतर नव्या पहिलीतील विद्यार्थ्यांचे स्वागत फुगे, फुलं व गोडधोड वाटप करून करण्यात आले. शाळेच्या शिक्षकांनी त्यांच्या पालकांशी संवाद साधत शिक्षणातील महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमासाठी आठवड ग्रामपंचायतचे उपसरपंच शंकरराव मोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नानासाहेब गाडे, पालक, शिक्षकवृंद आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र ढगे सर, त्यांचे सहकारी संदीप वाघमारे सर, वाबळे सर, भद्रे सर आणि साठे मॅडम, व अंगणवाडी ताई आणि विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप वाघमारे सर यांनी केले आणि आभार प्रदर्शन वाबळे सर यांनी केले.

# स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यो.शि.संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या विकास समितीचे सदस्य अभिजित जोंधळे, प्राचार्य पी.आर. थारकर आदी उपस्थित होते.



या प्रसंगी बोलताना जोंधळे म्हणाले की, पदवी घेऊन ज्ञान, कौशल्याने देशाचा विकास करावा पुढील काळात अनेक संधी आहेत त्याचा उपयोग करून घ्यावा असेही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी सजग राहावे व मेहनत करून यशाला गवसणी घालावी असे मत अध्यक्षीय समारोपात चौसाळकर यांनी व्यक्त केले.

बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्देशानुसार झालेल्या या कार्यक्रमात पदवी प्रमाणपत्रांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. एम.ए.राज्यशास्त्र विषयात विद्यापीठात सर्वप्रथम आलेल्या राहुल हजारे तर इंग्रजी विषयात विद्यापीठात बी.ए.च्या परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या व सुवर्णपदक प्राप्त केलेल्या कु.स्नेहल पाचनकर हिला सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर. थारकर यांनी केले. संचालन नाट्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी यांनी तर आभार प्रा.डॉ.रमेश सोनवळकर यांनी मानले. याप्रसंगी रमेश सोनटक्के, गंगाधर अकलोड, पदव्युत्तर विभागाच्या संचालिका डॉ.शैलजा बरुरे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# 'एकता' च्या राज्य सल्लागार ॲड.भाग्यश्री ढाकणेंची माणुसकी; अन् ग्रामीण समूह जीवनाची जाणीव!

आपली प्रत्येक कृती आणि त्यामागचा भाव हा राष्ट्रसमर्पपणाचा, माणुसकीचा आणि राष्ट्रहिताचा असावा; किंबहुना त्या दृष्टीकोनातून प्रमाणिक देशाभिमानी नम्रसेवा भावी आणि सहृदयी दर्शन घडावे ही अपेक्षा असते. या गुणांचा समुच्चय असणारे आजही विविध क्षेत्रात माणुसकी जपणारे व्यक्तिमत्व आढळून येते. महाराष्ट्रभर सामाजिक समतोल आबाधित ठेवण्यासाठी साहित्याच्या माध्यमातून सेवेचे नवे क्षितीज निर्माण करणाऱ्या 'एकता' फाउंडेशनच्या राज्य सल्लागार, सामाजिक कार्यकर्त्या ड.भाग्यश्री ढाकणे यांच्या माध्यमातून ही प्रचिती नुकतीच आली.

राजकारणात राहूनही समाजभान अधिक ठेऊन सामाजिक, धार्मिक, वैचारिक, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रामध्ये आपले एक पाऊल पुढे ठेवून... सामाजिक समरसता जपण्याचे मौलिक कार्य भाग्यश्रीताई ढाकणे यांच्या माध्यमातून होत असल्याचे दिसून येते. गेल्या दोन दशकाहून अधिक काळ महिलांच्यासाठी जनजागृती, त्यांचा मानसन्मान जपण्यासाठी घेतलेले अनेक उपक्रम... तसेच साहित्य क्षेत्राची त्यांच्या रूपाने होत असलेली निरंतर अविरत सेवा अधोरेखित करण्यासारखी आहे.

नुकत्याच संपन्न झालेल्या सातव्या एकता मराठी साहित्य संमेलनामध्ये स्वागताध्यक्ष म्हणून भाग्यश्री ढाकणे- चेमटे यांच्या रूपाने या संमेलनाला आलेले साहित्य सौंदर्य खऱ्या अर्थाने त्यांच्या निस्वार्थ सामाजिक बांधिलकी आणि जनमानसातील आपुलकी स्नेह या कार्यप्रणालीची साक्ष देते.



पुस्तके ही मानवी जीवन आनंदी व अर्थपूर्ण करतात याची जाणीव ठेवून त्यांनी जगातील सौंदर्यपूर्ण वस्तू म्हणजे पुस्तक! हे ठामपणे सांगितलं. असामान्य प्रतिभेची ओळख आपल्या ओघवत्या, भावात्मक आणि मूल्यात्मक संस्कृतीचे मनावर खोल संस्कार होऊन ग्रामीण भावविश्वाचे तसेच कृषी संस्कृतीतील शेकडो तपशिलांचे सहज संदर्भ त्यांच्या एकूण जीवनशैलीत मिळतात.

बुधवारी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय अजित दादा पवार बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना शिक्षण क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी भाषा विषय शिक्षक महासंघाच्या शिक्षक पदाधिकाऱ्यांनी उच्च माध्यमिक स्तरावर मराठी विषय अनिवार्य करावा अर्थात १३ सप्टेंबर २०२४ च्या निर्णयाची अंमलबजावणी करावी, यासाठी निवेदन घेऊन दादांकडे जाण्यासाठी धडपडणाऱ्या पदाधिकाऱ्यांना सामाजिक कार्यकर्त्या भाग्यश्री ढाकणे यांनी ग्रामीण भागातील या अध्यापकांची जाणीव ठेवून दादांसमवेत भेट घडवण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. निवेदन देऊन झाल्यानंतर या शिक्षक बांधवांच्या चेहऱ्यावरील कृतज्ञता भाग्यश्रीताई ढाकणेंच्या भविष्यातील यशदायी जीवनाला खऱ्या अर्थाने पुण्यात्मक शुभेच्छा देणारी ठरेल यात शंका नाही.

एकता फाउंडेशन' च्या साहित्य क्षेत्रातील चळवळीत विशेष योगदान दिल्याबद्दल एकता चे संस्थापक अध्यक्ष तथा मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य साहित्यिक अनंत कराड, एकताचे सचिव पत्रकार गोकुळ पवार आणि एकता कोअर कमिटीतील पदाधिकाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले; तर शिक्षण क्षेत्रातील या सहकार्याबद्दल कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा.सुनील डिसले यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा अध्यक्ष प्रा.डॉ.आत्माराम झिंजुर्डे, बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.डॉ.अशोक देवगुडे, बीड जिल्हा सचिव प्रा.बिभिषण चाटे यांनी सामाजिक कार्यकर्त्या ड.भाग्यश्रीताई ढाकणे यांना मनःपूर्वक धन्यवाद दिले.

## पशूसंवर्धन विभागाचे काम अधिक गतीमान करण्यासाठी मंत्री पंकजा मुंडे यांचे महत्वाचे पाऊल

# पशुधन विकास अधिकाऱ्यांची २७९५ रिक्त पदे भरणार




मुंबई । प्रतिनिधी

**पशुसंवर्धन विभागाचे काम पूर्ण क्षमतेने करण्यासाठी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी महत्वाचे पाऊल उचलले असून विभागातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्याअंतर्गत पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर करण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.**

ग्रामीण भागात पशुसंवर्धन विभागाचे काम गतीने व पूर्ण क्षमतेने होण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय तसेच त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील पशुधन विकास अधिकारी पद महत्त्वाचे आहे. सुधारित आकृती बंधानुसार महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अ अंतर्गत पशुधन विकास अधिकारी संवर्गात एकूण ४६८४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्यःस्थितीत १८८६ पदे भरलेली असून २७९८ पदे रिक्त आहेत. तसेच ३१ डिसेंबर २०२५ अखेर ८ पदे सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणार आहेत. असे एकूण २८०६ पदे रिक्त होणार आहेत. ही पदे रिक्त असल्याने कामकाजावर परिणाम होत होता. या गोष्टीची दखल घेत पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी पाठपुरावा करून पशुधन विकास अधिकारी संवर्गातील पदे भरण्याचा निर्णय घेतला. यापैकी सरळसेवा जाहिरात क्र. १२/२०२२ मधील प्रतिक्षायादीतील ११ पदे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित २७९५ पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आले असून लवकरात लवकर भरती प्रक्रिया राबविण्यात यावे, असे एमपीएससीला कळविण्यात आले आहे. ही रिक्त पदे भरल्यानंतर विभागाचे कामकाज अधिक वेगाने होऊन ग्रामीण भागातील पशुपालक तसेच शेतकरी बांधवांना चांगल्या दर्जाची सेवा उपलब्ध होईल, असा विश्वास पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

# विजय कंट्रक्शनच्या नालायकपणामुळे अनेक गावाला पाणी नाही



केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील बेलगाव जाधव जवळा आरणगाव डोणगाव टाकळी कदमवाडी शिरपुरा आशा अनेक गावाला या सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदाराची जलजिवनची कामे आहेत या गावांमध्ये जलजिवनचे काम अध्याप झाले नाही सध्या केज तालुक्यांमध्ये कडक उन्हाळ्या चालू आहे जर आता लोकांना पाणी पिण्यासाठी मिळाले नाही तर या योजनेचा काय फायदा हा जो सुशांत खवतड नावाचा जो गुत्तेदार आहे तो केज तालुक्यातील एका सभापतींच्या जवळचा आहे अशी पण माहिती मिळत आहे.

सभापतींच्या जवळचा असल्यामुळे तर हा गुत्तेदार कामचुकार पणा तर करत नाही ना जर तसं असेल तर त्या सभापतीला जनता येणाऱ्या निवडणुकीतमध्ये जागा दाखवेल. जलजिवनचे अर्धेच कामे केली आहे सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदाराने जवळपास ८०% बील ही उचलले. केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये विजय कन्स्ट्रक्शन कंपनीची कामे आहेत त्या ठिकाणी पण हीच अवस्था आहे या गुत्तेदाराने भोगस कारभार करुन अनेक गावांमध्ये त्या गुत्तेदारानी जलजिवनच्या कामात कोट्यवधी रुपयांचा निधी हडपला आहे अशा भोगस काम करणाऱ्या गुत्तेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकले पाहिजे.

या गुत्तेदाराने जलजीवन च्या नावाखाली कोठ्याधिश रुपयाचा निधी हडप केला आहे. यावर तात्काळ कारवाई झाली पाहिजे इतक्या कडक उन्हाळया मध्ये फक्त अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे या गावांना पाणी पिण्यासाठी नाही. या सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदारावर तात्काळ कारवाई झाली पाहिजे अशी या गावातील नागरिकांची मागणी आहे.

# आरक्षण वर्गीकरण अंमलबजावणी मोर्चाला मातंग समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## अन्याय अत्याचाराच्या विरोधात उपजिल्हाधिकारी यांना मुलींच्या वतीने निवेदन सादर

परतूर । प्रतिनिधी

आज दिनांक ८ एप्रिल रोजी परतूर शहरात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनुसूचित जाती प्रवर्गात आरक्षण वर्गीकरण लागू करणे आणि मातंग समाजावर होत असलेल्या अन्याय अत्याचारा विरोधात मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते. प्रामुख्याने मोर्च्यात अनुसूचित जाती प्रवर्गात आरक्षण वर्गीकरण झालेच पाहिजे आणि आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे या मागणीच्या पाट्या हातात घेत नागरिकांनी उत्सूर्फपने घोषणा दिल्या. क्रांतीगुरू लहुजी साळवे चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालय या मार्गे शिस्तबद्धतेने मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. दरम्यान उपजिल्हाधिकारी यांना कुमारी माहेश्वरी आव्हाड, अश्विनी हिवाळे, रूपाली हिवाळे, आरती साबळे या मुलींच्या वतीने निवेदन देण्यात आले.




व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते गणपत भिसे, ॲड.विलास साबळे, ॲड राम चव्हाण, मारुती वाडेकर, राजू कसबे, संजूबाबा गायकवाड, भास्कर नाना शिंदे, शिवाजी भाऊ कांबळे, संतोष तुपसौंदर्य, रविकांत जगधने, शिवराज जाधव, रंगनाथ गजले, सुरेश साळवे, रवी पाखरे किसन लाडगे, गुलाब साठे, नामदेव साळवे यांची उपस्थिती होती. आयोजित मोर्च्यात दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजीच्या सर्वोच्च न्यायालय निर्णयाच्या अनुषंगाने १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णया नुसार महाराष्ट्र शासनाने राज्यात तात्काळ आरक्षण वर्गीकरण विधेयक मंजूर करून येत्या जुन महिन्यापासून आरक्षण वर्गीकरणाची आमलबजावणी करून अनुसूचित जातीतील अतीवंचित जातींना संविधानिक समतेचा सामाजिक न्याय मिळवून द्यावा.याबाबतची मागणी व्यासपीठावरील मान्यवरानी केली. तसेच दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी परभणी येथील अतीवंचित असणाऱ्या मातंग समजातील निष्पाप अल्पवयीन बालीकेवर निराधमानी केलेला अत्याचार प्रकार अत्यंत घृणास्पद आणि निंदनीय आहे. याबाबत आरोपीला फाशीची शिक्षा होण्यासाठी विशेष चौकशी पथक स्थापन करून सदर खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात यावा आणि नराधम आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे आणि या प्रकरणातील अधिकच्या आरोपींवर कायदेशीर कडक कार्यवाही करावी.

आणि महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जातीतील अतीवंचित असणाऱ्या मातंग समाजावर दैंनदिन सातत्याने घडत असलेले अन्याय अत्याचार मालिका ही अत्यंत दुर्दैवी बाब असून याबाबत महाराष्ट्र सरकारने प्रत्येक घटनेतील गुन्ह्यात विशेष चौकशी पथक स्थापन करून दोषी आरोपींवर कायदेशीर कडक शासन करावे आणि मातंग समाजाला तात्काळ न्याय मिळवून द्यावा. याबाबत मोर्च्यातची मागणी करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अशोक साबळे, इंद्रजीत हिवाळे, ज्ञानेश्वर साळवे, विठ्ठल भारसाकळे, दत्ता हिवाळे, विलास लोखंडे, सुंदर भारसाकळे, पांडुरंग नाटकर, प्रकाश लोंढे, लखन कांबळे, गणेश आव्हाड यांनी परिश्रम घेतले.



समाजसेवक मुसा खान साहेब यांचे पुत्र अजमत खान मुसा खान यांची लिपिक म्हणून मिलीया कॉलेज बीड येथे नियुक्ती झाल्यामुळे बीड शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री बल्लाळ साहेब यांनी शुभेच्छा दिल्या तसेच समाजातील सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन व कौतुकांचा वर्षाव होत आहे.




## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ) केज जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन संपन्न

केज । प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ) जनसपंर्क कार्यालय केजचे भव्य उदघाटन आर.पी. आयचे जिल्हाकार्याध्यक्ष रियल पँथर संदीपान तात्या हजारे यांचे हस्ते पार पडले. केज शहरामध्ये जनसंपर्क कार्यालय व्हावे ही अनेक दिवसांपासूनची कार्यकर्त्यांची मागणी आज खऱ्या अर्थाने पूर्ण झाली.

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या अनेक कार्यकर्त्यांनी हजेरी लावली होती. केज तालुका अध्यक्ष सुनील जी हिरवे, भीष्मा हजारे, ईश्वर सोनवणे, बाबुराव गालफाडे, अंगद शिनगारे, विकास मस्के, भिमा हजारे, हिराचंद काळे, अमोल मस्के, सचिन ठोकळ आदी या प्रसंगी केज शहर व तालुक्यातील आर. पी. आयचे सर्व शाखा प्रमुख, पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते.

# गुंज येथील अपघातग्रस्त पीडित कुटुंबाला मुंबईचे धुपे यांच्या वतीने जीवनावश्यक अन्नधान्य किटचे वाटप

नांदेड । प्रतिनिधी

नांदेड व हिंगोली जिल्हा सिमेवर शेतकरी मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत कोसळून भीषण अपघात नांदेड जिल्ह्यातील आलेगाव शिवारात ही दुर्दैवी घटना घडली. या दुर्दैवी घटनेमध्ये वसमत तालुक्यातील गुंज येथील सात मजुर महिलांचा ट्रॅक्टर विहीरीत पडून मातंग समाजातील सहा व इतर एक अशा सात महिलांचा अपघाती मृत्यू झाल्याने वसमत तालुक्यातील गुंज गावावर शोककळा पसरली. या ठिकाणच्या तीन मुली आणि चार महिलांचा बुडून मृत्यू झाला या घटनेची माहिती गुंज च्या लहुजी नगर वस्तीवर पोहोचताच एकच आक्रोश झाला.

तीन मुली आणि चार महिलांचा बुडून मृत्यू झाला या घटनेची माहिती गुंज च्या लहुजी नगर वस्तीवर पोहोचताच एकच आक्रोश झाला. गावाकडे थांबलेले या कुटुंबातील सदस्यांनी आपली आई, बहीण पुन्हा दिसणार नाही. या विचाराने हंबरडा फोडला या वस्तीवर दिवसभर चुलही पेटली नाही. पोटाला दोन घास मिळावे या शोधात निघालेल्या महिलांवर काळाने घाला घातल्याने संपूर्ण गाव शोक सागरात बुडाले होते.



ही वार्ता मुंबई येथील सकल मातंग समाजाचे नेते आणि मातंग ग्रुप डेव्हलपमेंट(एम.जी.डी.) परिवाराचे मार्गदर्शक माजी मुख्याधिकारी एस.एस.धुपे साहेब यांच्या कानावर पडताच,आणि सदरील कुटुंबातील कमावत्या महिला गेल्याने कुटुंब उघड्यावर पडल्याचे माहित होताच, आपण समाजाप्रती देणे लागतो, या उदार विचाराने मा. धुपे साहेबांनी त्यांच्या वतीने पिडीत अपघातग्रस्त सर्व कुटुंबातील दहा सदस्यांना जीवनावश्यक विविध संसार उपयोगी अन्नधान्य, किराणा, जीवनावश्यक किटचे (प्रती कुटुंब ३५ किलोचे किट असे अन्नधान्य, किराणा, जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असणारे १० किट) वाटप केले.

मानवता धर्म म्हणून प्रत्यक्ष गुंज ता.वसमत या गावी भेट देऊन वस्तीवरील समाज बांधवांना या अन्नधान्याच्या कीट भेट म्हणून देण्यात आल्या. आपण ज्या समाजात जन्मलो त्या समाजाचे काही देणे लागते. या उदात्त भावनेतून मी मुंबईहून आपल्या भेटीसाठी येऊन ही माझी छोटीशी भेट आपणास देत आहे. ती स्वीकारावी अशी नम्र विनंतीही सेवानिवृत्त मुख्याधिकारी एस.एस. धुपे यांनी यावेळी केली. माजी मुख्याधिकारी श्री एस एस धुपे साहेब हे प्रत्येक प्रसंगी समाजाला योग्य ती मदत नेहमी करत असतात. यावेळी गेवराई व नांदेड येथील मान्यवरांच्या उपस्थितीत या संसार उपयोगी दहा किट चे वाटप करण्यात आले.

यावेळी नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता सुग्रीव अंधारे, महापालिकेचे कार्यकारी अभियंता प्रकाश कांबळे, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक शिवा कांबळे, गेवराई नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष ब्रह्मदेव धुरंधरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक खाजेकर सर, सामाजिक कार्यकर्ते एन.जी.पोतरे, डी. एन. शेळके, युवा नेते बाळू लोंढे, संजय गोटूमुखे, उप अभियंता प्रकाश ईश्वरे, अण्णा भाऊ साठे क्रांती आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष सतीश कावडे, प्रदेशाध्यक्ष उत्तम बाभळे, शिवाजी नुरुंदे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रोडे साहेब, महापालिकेचे उप अभियंता बाशेट्टी साहेब, साहित्यिक आणि कवी मनोहर बसवंते आदी मान्यवरांची उपस्थिती असून पीडित आणि समाज बांधव याची उपस्थिती होती.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT